**L. A. BILL No. LII OF 2023.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.**

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६१ चा महा. २७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २८-१अअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २८-१अअ मधील,— १९६१ चा महा. २७.

(१) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३-१अ) या कलमात व कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-एक भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना, वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी त्यासाठी कोणतेही अधिमूल्य न आकारता, वर्ग-एक भोगवट्यावर देण्यात आल्या असल्याचे मानण्यात येतील ;

(ब) जर एखाद्या व्यक्तीने, औद्योगिक उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनी, वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनी असतील तर, पोट-कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस किंवा तिच्या कायदेशीर वारसांना वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनी, जर अशा जमिनींना लागू असलेले संबंधित अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये असे रूपांतरण करण्याची तरतूद असेल तर, उक्त अधिनियम व नियम यांच्या तरतुदींनुसार वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरित करता येतील.";

(२) पोट-कलम (३अ) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल : —

"(३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाद्वारे निर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, त्याने निश्चित केलेल्या दरांत, शासकीय किंवा निमशासकीय संस्थांना अथवा महानगरपालिकेला, नगरपरिषदेला, नगर पंचायतीला किंवा ग्राम पंचायतीला सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याकरिता विल्हेवाट करता येईल.

**स्पष्टीकरण.—**या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी "सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ,—

(अ) (एक) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केलेल्या परिषदेच्या किंवा नगर पंचायतीच्या नगरपालिका क्षेत्रापासून ; १९६५ चा महा. ४०.

(दोन) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रापासून ; किंवा १९४९ चा ५९.

(तीन) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१०) मध्ये व्याख्या केलेल्या गावठाणाच्या किंवा गावाच्या स्थळाच्या हद्दीपासून, १९६६ चा महा. ४१.

पाच किलोमीटरच्या परिसरात स्थित असलेल्या शैक्षणिक, वैद्यकीय, सार्वजनिक आरोग्य, समाजकल्याण किंवा सांस्कृतिक प्रयोजनांसाठी ; किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेत नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी ; किंवा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये समाविष्ट असलेल्या अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठी ; आणि १९६६ चा महा. ३७. २०१३ चा १३.

(ब) या प्रयोजनासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या सार्वजनिक प्रकल्पातील प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी,

जमिनीची विल्हेवाट लावणे, असा आहे.".

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मधील, पोट-कलम (३) मध्ये,— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम २९ ची सुधारणा.

(एक) पहिल्या परंतुकामधील, " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करील अशी रक्कम " या मजकुराऐवजी, पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

" महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेच्या वास्तव बाजारमूल्याचे निर्धारण) नियम, १९९५ याच्या तरतुदींन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पंचाहत्तर टक्के इतकी रक्कम ";

(दोन) दुसरे परंतुक वगळण्यात येईल.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ मध्ये नवीन कलम २९अ समाविष्ट करणे.

" **२९अ.** कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, कलम २७ अन्वये वर्ग-दोन भोगवट्यावर दिलेल्या जमिनींचे,— कलम २७ अन्वये दिलेल्या जमिनीच्या भोगवट्याचे रूपांतरण.

(एक) अशी जमीन दिल्याच्या तारखेपासून दहा वर्षे उलटल्यानंतर ; आणि

(दोन) जर अशी जमीन देण्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले नसेल तर ; किंवा जर अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचे उल्लंघन केलेले असेल तर, असे उल्लंघन नियमाधीन केल्यानंतर,

विहित करण्यात येईल अशा रूपांतरण अधिमूल्याचे प्रदान केल्यावर आणि अशा कार्यपद्धतीचे अनुपालन केल्यानंतर आणि अशा इतर अटी व शर्तींना अधीन राहून, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रूपांतरण करू शकेल.".

**५.** मुख्य अधिनियमाचे कलम ४०अ वगळण्यात येईल. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ४०अ वगळणे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४६ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(इ-१) कलम २९अ अन्वये वर्ग-दोन भोगवट्याच्या जमिनींचे, वर्ग-एक भोगवट्यामध्ये रुपांतरण करण्याचे रूपांतरण अधिमूल्य, त्याची कार्यपद्धती आणि त्याच्या इतर अटी व शर्ती ;".

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**७.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२.]**

**[ महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील,**
महसूल मंत्री.)

**[ विधानसभेने दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**श्री. जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर